मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण विभाग
क्र.वि.क/४३/२०१३

डॉ. मृदुल निळे
प्र.संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०

परिपत्रक :

विषय : व्यसनमुक्ती बाबतची भित्तीपत्रके व जन जागृती कार्यक्रमा विषयी विनंती पत्र.

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठाचे सर्व संलग्नित महाविद्यालयांचे/संस्थाचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठातील सर्व संस्थाचे संचालक, विभागांचे प्रमुख, सर ज.जी वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, यांना प्रस्तुत परिपत्रकाद्वारे मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार असे सूचित करण्यात येते की, बृहन्मुंबई महानगर पालिकेद्वारा व्यसनमुक्ती केंद्र, भराडावाडी, अंधेरी (पश्चिम) येथे दारू, गर्द, चरस, गांजा, झोपेची औषधे, व्हाईटनर इ. व्यसनांसाठी मोफत उपचार केले जातात.

युवकांमध्ये नशेचे वाढते प्रमाण तसेच उपचाराविषयीची उदासीनता पाहाता व्यसनांपासून अलिप्त रहाण्यासाठी युवकांमध्ये जागृती निर्माण करणे व विद्यार्थ्यांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी आमंली पदार्थ व्यसनमुक्ती केंद्र, अंधेरि (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८ 'व्यसनमुक्ती जन जागृती' कार्यक्रम राबवित आहे.

तरी, मुंबई विद्यापीठा मार्फत मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीत येणा-या सर्व महाविद्यालयात व्यसनमुक्ती विषयीची पत्रके महाविद्यालयाच्या आवारातील प्रसिध्दी फलकावर संबधित महाविद्यालयाच्या वतीने लावण्यात यावीत.

तसेच काही महाविद्यालयात "व्यसनमुक्ती जन जागृती" कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागा मार्फत आमली पदार्थ व्यसन मुक्ती केंद्रास योग्यती मदत करण्यात येईल आणि संबंधित महाविवलयाना विनंती करण्यात येते की उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रत्येक वर्षात किमान तीन कार्यक्रम महाविद्यालय पातळीवर राबविण्यात यावे.

(डॉ. मृदुल निळे)
प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

दिनांक : १६ नोव्हेंबर,२०१३.